R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : २१

दि. ३० डिसेंबर २०२५, वार :मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## सेंट्रल पार्कची कामे गतीने पूर्ण करा - उपमुख्यमंत्री अजित पवार

बारामती: प्रशासकीय इमारतीच्या बाजूला नव्याने उभारण्यात येणारे सेंट्रल पार्क ही शहराच्या वैभवात भर पाडणारी वास्तू असून त्याची कामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि गतीने पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



उपमुख्यमंत्री पवार यांनी इंदापूर रस्ता व बसस्थानक परिसर सुशोभिकरण, सेंट्रल पार्क समोरील रिंगरोड सुशोभिकरण, महापुरुषांच्या पुतळ्याचे काम, जलतरण तलाव, गौतम बाग ते फडतरे वस्ती चौपदरी रस्त्याच्या कामाची पाहणी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, सेंट्रल पार्क बाहेरील रिंगरोडचे सुशोभीकरणाची कामे गतीने पूर्ण करावीत. प्रशासकीय इमारत आणि सेंट्रल पार्क दरम्यानच्या संरक्षक भिंतीची उंची वाढवावी.पदपथाच्या आतील बाजूस पाणी साचणार नाही, यादृष्टीने कामे करावीत.

सेंट्रल पार्कच्या समोरील जागेवर महापुरुषांचे पुतळे बसविण्याचे काम करण्यात येत असून पुतळ्यांच्या मागील बाजूस आकर्षक भिंतीचे काम करावे. पुतळ्याला हार घालतांना अडचण येणार नाही, यादृष्टीने त्याची उंची घ्यावी.

बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी होणार नाही, याकरिता रिक्षा, चारचाकी, दुचाकी यांच्याकरिता पर्यायी जागेचा विचार करावा. इंदापूर रस्त्यावरील जड, अवजड वाहनांच्या रहदारी विचारात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाने उपाययोजना कराव्यात. इंदापूर रस्त्याचे सुशोभीकरण करावे. गौतम बाग ते फडतरे वस्ती चारपदरी रस्त्याचे कामे गतीने पूर्ण करावी.

कालवा परिसरात उभारण्यात येणाऱ्या जलतरण तलावाच्या कामामध्ये उत्कृष्ट गुणवत्तेचे साहित्य वापरावे. कालवा परिसरात स्वच्छता राहील तसेच गाळ्याच्या दर्शनी भागात नावाचे फलक एकसारखे दिसेल, याबाबत दक्षता घ्यावी. शहरात अधिकाधिक वृक्षारोपण करावे. परिसरातील प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार स्वप्नील रावडे, गट विकास अधिकारी किशोर माने, मुख्याधिकारी पंकज भुसे, उपअभियंता सुभाष पाटील आदी उपस्थित होते.

## लातूरच्या पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकला पाहिजे या जिद्दीने कामाला लागावे

लातूर - देशात आणि राज्यात भाजपाची सत्ता असून शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी लातूर पंचायत समितीवर भाजपाचाच झेंडा फडकला पाहिजे यासाठी भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांसह नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी कार्यरत राहावे अशा सूचना भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केल्या.



भारतीय जनता पार्टी लातूर मंडल कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांसह भाजपा युवा मोर्चा, अनुसूचित जाती जमाती मोर्चा, ओबीसी मोर्चाच्या नवनियुक्त पावणे दोनशे पदाधिकाऱ्यांना युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे रविवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात वितरण करण्यात आले. यावेळी भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, मंडलाचे युवा मोर्चा अध्यक्ष प्रशांत शिंदे, अमर चव्हाण, अनुसूचित जाती मोर्च्याचे अध्यक्ष मारुती शिंदे, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष शंकर चव्हाण यांच्यासह आदिनाथ मुळे, संजय ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याला मान सन्मान आहे, इतर लोकप्रतिनिधी एवढाच भाजपाचा बूथ प्रमुख ही तोला मोलाचा असल्याचे सांगून यावेळी बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, गेल्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदार संघात युवा मोर्चाच्या तरुणांनी विशेष काम केले असल्याचा उल्लेख करून येणाऱ्या निवडणुकीत जिल्हा परिषद भाजपाच्या ताब्यात येणार असून लातूर पंचायत समितीवर ही भाजपाचा झेंडा फडकला पाहिजे याच जिद्दीने सर्व कार्यकर्त्यांनी काम करावे असे बोलून दाखवले.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पदाला न्याय द्यावा केंद्राच्या व राज्य शासनाच्या योजनेचा लाभ गरजूंना मिळावा यासाठी प्रयत्न करावेत. लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड साहेबांनी प्रत्येक गावागावात मोठ्या प्रमाणात विकास निधी दिला अनेक विकासाची कामे केली मात्र आपण केलेली कामे सांगायला कमी पडत आहोत तेंव्हा भाजपाच्या तरुण कार्यकर्त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सक्रिय व्हावे असेही आव्हान युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी केले.

प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी प्रास्ताविक केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी शंकर चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रमास लातूर तालुक्यातील भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी विवेक भीमनवार यांची नियुक्ती

मुंबई, : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अध्यक्षपदी विवेक लक्ष्मीकांत भीमनवार (भाप्रसे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचना जारी केली आहे.



भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१६ (१) अन्वये राज्यपालांनी ही नियुक्ती केली असून, विवेक भीमनवार यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून सहा वर्षे किंवा वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत (जे आधी होईल तोपर्यंत) ते या पदावर कार्यरत राहणार आहेत.

अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारेपर्यंत, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१६ (१-क) नुसार डॉ. अभय एकनाथ वाघ, सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.




## गडचिरोली महामॅरेथॉनमध्ये १४ हजार नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

गडचिरोली, (जिमाका) : आज केवळ नागरिक धावत नाहीत, तर गडचिरोलीचा विकास धावत आहे. गडचिरोलीकरांची ही जिद्द आणि सकारात्मक ऊर्जा जिल्ह्याचा कायापालट घडविल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी केले.



जिल्हा परिषद गडचिरोलीच्या प्रांगणात पोलीस दलाच्या वतीने आयोजित 'गडचिरोली महामॅरेथॉन' कार्यक्रमात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

यावेळी अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) छेरींग दोरजे, नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, उपमहानिरीक्षक अंकीत गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. निलोत्पल, केंद्रीय राखीव पोलीस दलाचे उपमहानिरीक्षक (परिचालन) अजय शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, लॉयड्स मेटल्स अॅण्ड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन तसेच अपर जिल्हाधिकारी नितीन गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महामॅरेथॉनला शुभेच्छा दिल्या असल्याचे सांगून, राज्यमंत्री ड. जयस्वाल यांनी मॅरेथॉनच्या सुंदर व यशस्वी आयोजनाची स्तुती केली. गडचिरोली जिल्हा आता इतर जिल्ह्यांना प्रेरणा देणारे काम करत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

१४ हजार धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद या महामॅरेथॉनमध्ये जिल्ह्याच्या विविध भागांतून सुमारे १४ हजार नागरिकांनी सहभाग घेतला. २१, १०, ५ आणि ३ किलोमीटर अशा विविध अंतरांच्या शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. नागरिक, युवक, विद्यार्थी, महिला तसेच पोलीस व सुरक्षा दलातील जवानांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला. मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून महामॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली. विशेष बाब म्हणजे, सहपालकमंत्री व उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः मॅरेथॉनमध्ये धावून सहभाग नोंदविला.

२१ किलोमीटर मॅरेथॉनमध्ये महिलांच्या गटात साक्षी पोलादवार तर पुरुषांच्या गटात रोशन बोदलवार याने प्रथम क्रमांक मिळविला. १० किलोमीटर मॅरेथॉनमध्ये महिलांच्या गटात मुन्नी मडावी आणि पुरुषांच्या गटात रोहन बुरसे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले.

# केज येथे तहसील कार्यालयाच्या प्रांगणातून ट्रॅक्टरसह ट्रॉली लंपास

केज/प्रतिनिधी-केज येथील तहसील कार्यालयाच्या प्रांगणातून ट्रॅक्टर सह ट्रॉली लंपास केल्याची घटना उघडकीस आली असून सदर घटनेचा सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे शोध चालू आहे.

सध्या जिल्ह्यामध्ये अवैध गौण खनिज माफियांनी आता थेट प्रशासनालाच आवाहन देण्यास सुरुवात केली आहे. जर महसूल विभागाच्या प्रांगणा मधून चोरी होत आहे तर केज शहरांमधील नागरिकांचे काय असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

केज येथे महसूल विभाग व केज पोलिस यांनी संयुक्त कारवाई करुन ताब्यात घेतलेला मुरुमाचा ट्रॅक्टर हा चक्क शासकीय कार्यालयाच्या प्रांगणातून पळवून नेल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी रात्रीच्या दरम्यान केज-कळंब रोडवर मुरूमाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती महसूल प्रशासनाला मिळाली होती. सदर मिळालेल्या माहितीवरून महसूल कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत पोलिसांना पाचारण केले. महसूल विभाग व केज पोलीस यांनी रात्री ११-०० वा. दरम्यान ट्रॅक्टर,ट्रॉलीसह ताब्यात घेतला. जप्त केलेली वाहने ही सुरक्षिततेसाठी सरकारी



कार्यालयाच्या परिसरात उभी करण्यात आली होती.

सीसीटीव्हीच्या आधारे ट्रॅक्टर लंपास करणाऱ्या चोराचा शोध सुरू आहे.

**चक्क बनावट चावीचा वापर करून केला पलायन**

सदरची कारवाई झाल्याचे समजताच संबंधित माफियाने अथवा त्याच्या सहकार्याने, साथीदाराने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेतला आहे असे जनसामान्यातून बोलले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या अज्ञात व्यक्तीने चक्क बनावट चावीचा वापर करून तहसील कार्यालयाच्या प्रांगणात उभा असलेला ट्रॅक्टर सह ट्रॉली स्टार्ट करून तिथून पळवून नेण्यात आली. सकाळी महसूल कर्मचारी यांच्या जेव्हा ही बाब लक्षात आली असता तेव्हा एकच खळबळ उडाली. सदर घटनेत सीसीटीव्ही गेमचेंजर ठरणार आहे,

महसूल विभागाच्या ताब्यात असलेले वाहन पळवून नेल्यामुळे आता पोलीस प्रशासन या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत आहेत. तहसील कार्यालय व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम वेगाने चालू आहे लवकरच ट्रॅक्टर चोरणारा आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता आहे. सदर घटनेमुळे सरकारी मालमत्तेच्या आणि जप्त केलेल्या वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्र्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे जर प्रशासनाच्या कार्यालय परिसरातून जप केलेली वाहने चोरीला जात असतील तर शहरातील व तालुक्यातील नागरिकांच्या वाहनांचे काय? असा सवाल जनसामान्यातून उपस्थित केला जात आहे.

# लातूरच्या बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ची उद्योगजगतात गरुडझेप

लातूर प्रतिनिधी :माणसाकडे जिद्द, चिकाटी आणि भविष्याचा वेध घेणारी दृष्टी असेल, तर सामान्य माणूसही असामान्य कामगिरी करू शकतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मूळचे लातूर जिल्ह्यातील रेणापूर



तालुक्यातील कोष्टगाव येथील रहिवासी स्व. पांडुरंगजी मुंदडा व स्व. फुलाबाई मुंदडा या दांपत्याने दिलेल्या संस्कारातून उभा राहिलेला उद्योगसमूह आज संपूर्ण उद्योगविश्र्वाचे लक्ष वेधून घेत आहे.

स्व. फुलाबाई यांच्या नावावरून स्थापन झालेल्या *बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. या कंपनीने लातूर जिल्ह्यातील पहिली आयपीओ (खझज) धारक कंपनी* होण्याचा मान पटकावला आहे. ही यशस्वी झेप नवोदित उद्योजकांसाठी कायमस्वरूपी प्रेरणादायी ठरत आहे.

छोट्या व्यवसायाचे वटवृक्षात रूपांतर-मुंदडा कुटुंबाने सुरुवातीला विविध क्षेत्रांमध्ये व्यवसाय उभारले. त्यामध्ये आनंद मिल्क एजन्सीज, मुंदडा फुड्स, येडेश्र्वरी आईस फॅक्टरी, येडेश्र्वरी पॅकेजिंग इंडस्ट्रीज, गोल्ड जिम, मुंदडा पॉलिमर्स, बाई-काकाजी इंडस्ट्रीज, बाई-काकाजी अक्का शुअर आणि अखेरीस बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. यांचा समावेश आहे. आईच्या निधनानंतर सर्व व्यवसायांना एकत्रित करत बाई-काकाजी उद्योग समूह हे नाव देण्यात आले.

सनरीच एक्काचाही होतोय झपाट्याने विस्तार-बाई - काकाजी उद्योग समूहाच्या सनरीच मिनरल वॉटरने आपल्या उत्पादनात सुरुवातीपासूनच एक उच्च दर्जा कायम ठेवला आहे. महाराष्ट्रासोबतच हे उत्पादन आता देशाच्या अनेक राज्यातील ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे. आरोग्यासाठी आवश्यक आणि पूरक असणारे घटक सनरीच मिनरल वॉटरमध्ये मुबलक प्रमाणात आहेत. त्यामुळे अल्पावधीतच या उत्पादनाने आपल्या व्यवसायाच्या कक्षा रुंदावण्याचे काम केले आहे. भविष्यात हे उत्पादन यापेक्षाही अधिक वेगाने ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्र्वास आहे. गुणवत्तेच्या बाबतीत कधीही तडजोड न करण्याच्या धोरणामुळेच सनरीच एक्काचाही झपाट्याने विस्तार होतो आहे.

दर्जेदार उत्पादन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान-पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या व शीतपेयांसाठी आवश्यक असणारे सर्व आकारांचे झएढ प्री-फॉर्म व कॅप क्लोजर उच्च दर्जाच्या प्लास्टिकपासून तयार केले जातात. यासाठी जर्मनी, जपान, इटली तसेच भारतातील अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर केला जातो. गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता ग्राहकांचा विश्र्वास संपादन करण्यात कंपनी यशस्वी ठरली आहे.

पर्यावरणपूरक दृष्टिकोन-औद्योगिक प्रगतीसोबतच पर्यावरणीय जबाबदारी जपत कंपनीने ५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारला असून, त्यामुळे विद्युत खर्चात लक्षणीय बचत झाली आहे. गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक बांधिलकी ही कंपनीची प्रमुख मूल्ये आहेत.

भव्य कार्यक्षेत्र आणि नामांकित ग्राहक-आज कंपनीचे कामकाज सुमारे ३३ हजार चौरस मीटर एवढ्या भव्य परिसरात चालते. आयआरसीटीसी (इंडियन रेल्वे), रिलायन्स कॅम्पा कोला, पार्ले बेली, पतंजली, टाटा वॉटर, सनरीच यांसारख्या नामांकित कंपन्या बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. च्या ग्राहकांमध्ये आहेत, याचा कंपनीला विशेष अभिमान आहे.

या यशस्वी वाटचालीत साडेतीनशेहून अधिक कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

आयपीओपर्यंतची ऐतिहासिक झेप-बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ने औद्योगिक क्षेत्रात आयपीओपर्यंत यशस्वी मजल मारली आहे. पहिल्या टप्प्यात १०५ कोटी रुपयांची शेअर विक्री करून आर्थिक गुंतवणूकदारांचा विश्र्वास संपादन करण्यात कंपनी यशस्वी ठरली आहे.

कंपनीचा आयपीओ शेअर बाजारात दि. २३ ते २६ डिसेंबर २०२५ या कालावधीत खुला होता, तर ३१ डिसेंबर २०२५ रोजी कंपनीची यशस्वी लिस्टिंग होत आहे, ही लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

भविष्याकडे आशावादी वाटचाल-, गुंतवणूकदारांचा विश्र्वास कायम ठेवून उद्योगसमूहाची यशस्वी वाटचाल सुरू ठेवण्याचा निर्धार बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ने व्यक्त केला आहे.

# वझे महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मदतीचा अन स्नेहाचा एक हात, बेघर मुलांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

मुंबई : बेघरपणा हा समाजातील उपेक्षिततेचा सर्वात वाईट प्रकार आहे. अत्यंत गरिबी, उच्च पातळीची असमानता आणि भेदभाव ही बेघर होण्याची प्राथमिक कारणं आहेत.



बालपणच हरवून बसलेली, दुर्बल स्तरातली मुलं लहान वयात विविध कारणांमुळे घरापासून दुरावलेली असतात, स्टेशन किंवा फुटपाथवर राहणारी, पोटाची खळगी भरण्यासाठी राबणारी जगण्यासाठी पावलोपावली जीवघेणा संघर्ष करणाऱ्या या मुलांना मानसिक आधार, सर्व मानवी हक्कांपासून दूर होऊ न देणं, त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होणार नाही याची काळजी घेणे आणि त्याचबरोबर त्याला डोक्यावर छप्पर देणं असं सामाजिक कणव असलेले काम जीवन संवर्धन फाउंडेशनच्या वतीने गेली अनेक वर्षे होत आहे. वझे उत्सवाच्या माध्यमातून महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत स्नेहाची साथ मदतीचा एक हात हा विशेष उपक्रम नुकताच यशस्वीरीत्या राबविला आहे, या माध्यमातून संस्थेच्या कामाची माहिती आम्हाला जवळून घेता आली. सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणिवेतून जगण्यातला आनंद हा नाव, पैसा, प्रसिद्धी, लौकिक ह्याच्या पलीकडे अनुभवायचा असेल तर ह्या लेकरांकडे बघून तो घेता येतो आणि आपण किती सुखात राहतो तरीही तक्रारी करत फिरतो ह्याची वारंवार आठवण होत राहते. अशी भावना प्रा. निकिता माने यांनी व्यक्त केली. वझे महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. (डॉ.) प्रिता निलेश तसेच व्यवस्थापन सचिव मा. डॉ. बी. बी. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जीवन संवर्धन फाउंडेशन गुरुकुल संचलित, म्हस्कळ, टिटवाळा, जिल्हा ठाणे या संस्थेला भेट देण्यात आली. त्या पुढे असेही म्हणाल्या की, आमच्याकडून काही भेटवस्तू देण्यात आल्या परंतु वस्तूंच्या देवाणघेवाणपेक्षा देश तिसरी महासत्ता बनण्याच्या दिशेने प्रगती करीत असला तरी समाजातला हा एक गंभीर आजार खोलवर रुजला आहे, त्याची व्यापकता आणि संस्थेचे सेवाभावी कार्य यनिमित्ताने आम्ही समजून घेऊ शकलो. त्याचबरोबर माणुसकी, आपुलकी,सामाजिक जबाबदारीची जाणीव व्यक्त करणारे अल्पसे कार्य आमच्या हातून घडले. शिक्षणमहर्षी भाऊसाहेब वझे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून चांगला विद्यार्थी आणि त्यातून राष्ट्रकार्यासाठी सदैव सामाजिक सजग भान जपणारा नागरिक घडावा याहेतूने शिक्षण संस्था काढली. आम्हा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून सामाजिक जाणीवा वाढविणारे अत्यंत प्रेरणादायी आणि संवेदनशील काम आज घडले. वझे उत्सव हा नुसता स्पर्धांचा कार्यक्रम नाही तर त्यातून संस्कृतीचे मूल्य वाढवणारा महाविद्यालयीन कार्यक्रम घडला याचा आज आम्हाला आनंद होत आहे.

मुलुंड येथील केळकर शिक्षण संस्था संचलित विनायक गणेश वझे महाविद्यालय (स्वायत्त) येथे सालाबाद प्रमाणे वझे-उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवा अंतर्गत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आंतरमहाविद्यालयीन विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आणि या स्पर्धांना विविध महाविद्यालयांतून दरवर्षी प्रमाणे उत्स्फूर्त आणि प्रचंड प्रतिसाद लाभला. यावेळी श्री. दिलीप पवार आपले विचार मांडताना म्हणाले की, विज्ञानवादी दृष्टिकोन, कला, एकत्र खेळ, चिकित्सक, विजिगीषु वृती आणि सर्वसमावेशक संस्कृतीमुळे आपण सर्वच माकडांपासून माणसात आलोय. एकमेकांची साथ देणं, घेणं आणि सामाजिक जाणिवेतून समाज घडतो याचे भान राखणे हे महत्वाचे आहे. मानवी उत्क्रांतीचा पाया अशा प्रायोरिटी कळण्यातूनच सूरू होतो. देणारा हा कायम सर्वश्रेष्ठच असतो. मग तो आधाराचा शब्द असो वा अडचणीच्या वेळी दिलेला मदतीचा हात...! वझे उत्सव कमिटीने याच भावनेने मनाला समाधान देणारा कार्यक्रम केला.

यावेळी जीवन संवर्धन फाउंडेशनच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या बेघर अनाथ मुलांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या आवश्यक गरजे नुसार २० बेंचेस,टी व्हि संच, शुद्ध थंड / साध्या पाण्याचा कुलर, ब्लँकेट्स, टी-शर्ट्स तसेच मिठाई देण्यात आली. हा सामाजिक उपक्रम यशस्वी व्हावा यासाठी महाविद्यालयाचे अधिक्षक श्री. संतोष डगळे तसेच वझे उत्सव कमिटीचे अध्यक्ष श्री. गोविंद जोशी यांच्या नेतृत्वाखाली अनेकांनी उल्लेखनिय काम केले. त्यांच्या प्रभावी नियोजनामुळे व समन्वयामुळे आणि केळकर-वझे महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी परिवारामुळे हा प्रेरणादायी उपक्रम अत्यंत नियोजितरित्या, शिस्तबद्ध व यशस्वीपणे पार पडला.

# श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेबांनी घालून दिलेल्या आदर्शाचे अनुकरण करु या माजी उपमहापौर चंद्रकांत बिरादार

लातूर -देशाचे माजी गृहमंत्री, लातूरचे सुपुत्र आणि लिंगायत समाजाचे भूषण श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब यांच्या निधनाने समाजाचा आधारवड कोसळला असून ही हानी कधीही भरून न निघणारी आहे. समाजासाठी, देशासाठी आणि माणुसकीसाठी जे-जे करता येईल ते-ते करण्याचा प्रयत्न त्यांनी आयुष्यभर केला. मात्र त्यांच्या विचारांची उंची आणि कार्याचा आवाका कुणालाही पूर्णपणे घेता आला नाही. त्यामुळे श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब यांनी घालून दिलेल्या आदर्शाचे आपण सर्वांनी अनुकरण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे भावनिक उद्गार माजी उपमहापौर चंद्रकांत बिरादार यांनी काढले.लिंगायत शरण फाउंडेशन, लातूरच्यावतीने औसा रोड येथील रितुल स्टुडिओ परिसरात आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक श्रद्धांजली सभेत ते बोलत होते.



यावेळी महेश पाटील, गुरु बिरादार, राजकुमार कत्ते, अमोल कत्ते, ॲड. शेखर हाविले, डॉ. संजय गवई, प्रा. राजेश विभुते, विजयकुमार गुत्ते आदि श्रद्धांजलीपर विचार व्यक्त करताना महाणे की, देशाचे माजी गृहमंत्री श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब यांचे दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ लिंगायत समाजच नव्हे तर संपूर्ण देशाने एक दूरदृष्टी असलेले नेतृत्व गमावले आहे. श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेब हे सर्वधर्मसमभावाचे प्रतीक होते. सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्ये यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. केंद्रीय गृहमंत्री म्हणून त्यांनी देशाच्या सुरक्षेसोबतच सामाजिक शांततेला नेहमीच प्राधान्य दिले. त्यांच्या कार्यकाळात घेतलेले निर्णय आजही मार्गदर्शक ठरतात. त्यांचे विचार, कार्य आणि माणुसकी हीच पुढील पिढीसाठी प्रेरणास्थान राहील.यावेळी उपस्थित सर्वांनी दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रद्धेय शिवराजजी पाटील चाकूरकर साहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले.यावेळी डॉ. सिद्राम डोंगरगे, राहुल पत्रिके, प्रदीप हलकंचे, बसवेश्र्वर हेंगणे, गुरुनाथ उचेकर, नागेश पटणे, आर. सी. पाटील, प्रा. नागेश सुगरे, रामचंद्र बिराजदार, महेश आंबुलगे, रितेश पाटील, इराण्णा पावले आदि सह लिंगायत शरण फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर महापालिका निवडणूक २०२५ : प्रभाग क्रमांकानुसार नामनिर्देशन अर्जांची माहिती

लातूर प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी नामनिर्देशन प्रक्रियेला वेग आला असून २९ डिसेंबर २०२५ पर्यंत प्रभाग क्रमांकानुसार खालीलप्रमाणे अर्ज विक्री व दाखल झाले आहेत.

प्रभाग क्रमांकानुसार नामनिर्देशन अर्ज विक्री व दाखल (२९ डिसेंबर २०२५ पर्यंत)

प्रभाग १ : विक्री ६३ । दाखल ११
प्रभाग २ : विक्री ४४ । दाखल २०
प्रभाग ३ : विक्री ७४ । दाखल १४
प्रभाग ४ : विक्री ५१ । दाखल ४
प्रभाग ५ : विक्री २८ । दाखल ३
प्रभाग ६ : विक्री ४७ । दाखल ५
प्रभाग ७ : विक्री ५३ । दाखल ५
प्रभाग ८ : विक्री २५ । दाखल ५
प्रभाग ९ : विक्री ६९ । दाखल ५
प्रभाग १० : विक्री ३८ । दाखल ७
प्रभाग ११ : विक्री ३१ । दाखल ३
प्रभाग १२ : विक्री २७ । दाखल ११
प्रभाग १३ : विक्री ५० । दाखल ६
प्रभाग १४ : विक्री २७ । दाखल १३
प्रभाग १५ : विक्री ४६ । दाखल २४
प्रभाग १६ : विक्री ३९ । दाखल ८
प्रभाग १७ : विक्री २१ । दाखल १०
प्रभाग १८ : विक्री २४ । दाखल २

एकूण
नामनिर्देशन अर्ज विक्री : ७५७
नामनिर्देशन अर्ज दाखल : १५६

प्रभाग १५ व प्रभाग १४ मध्ये अर्ज दाखल करण्याचा उत्साह तुलनेने अधिक दिसून येत आहे. येत्या अंतिम तारखेपर्यंत सर्वच प्रभागांमध्ये अर्ज दाखल होण्याचा वेग वाढण्याची शक्यता असून निवडणूक वातावरण तापू लागले आहे.

हवे असल्यास याच माहितीवर संक्षिप्त बातमी, मथळ्यासह रिपोर्ट, किंवा तालुकास्तरीय/राजकीय विश्लेषणही करून देऊ शकतो.

## न्यायालयात साक्ष का दिली? म्हणुन कोयता, कुऱ्हाडीने केला हल्ला; ११जाणविरुद्ध गून्हा नोंद




केज/प्रतिनिधी–केज न्यायालयात चालु आसलेल्या प्रकरणात आमच्या विरोधात साक्ष का दिली?, या कारणावरून ११ जणांनी एकाच कुटुंबातील ७ जणावर कोयता, कुऱ्हाडीचा तुंबा व काठीने हल्ला केल्या प्रकरणी पोलीस अधीक्षक यांच्या आदेशावरून तब्बल ९ महिन्या नंतर जयश्री काकडे याच्या फिर्यादी वरून अकरा जणांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

१८ मार्च २०२५ रोजी रामभाऊ काकडे आणि त्यांचे कुटुंबीय शेतात काम करीत असताना, केज न्यायालयात न्यायप्रविष्ठ आसलेल्या प्रकरणी आमच्या विरुद्ध साक्ष का दिली.? या कारणावरून भावकीतीलच ११ जणांनी कोयता, कुऱ्हाडीचा तुंबा व काठीने सात जणाला मारहाण केली होती. या प्रकरणी जयश्री काकडे यांनी केज येथील पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार दिलि होती. परंतु याप्रकरणी गून्हा नोंद झाला नव्हता. त्यामुळे जयश्री काकडे यांच्या वतीने त्यांच्या नातेवाईकांनी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांची भेट घेवून आरोपीविरुद्ध गून्हा नोंद करण्याची मागणी केली होती. त्यावर पोलिसांनी सखोल तपास करून गून्हा दाखल करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांनी दिले होते. केज पोलिसांनी या प्रकरणी सखोल चौकशी करून दिनांक २६ डिसेंबर २०२५ जयश्री काकडे यांच्या फिर्यादी वरून संगनमत करून, व मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी राजाभाऊ मारूती काकडे, बाबासाहेब मारूती काकडे, गोकुळ बालासाहेब काकडे, हरीओम राजाभाऊ काकडे, लक्ष्मी बालासाहेब काकडे, अनुराधा बाबासाहेब काकडे, विद्या राजाभाऊ काकडे, सुदामती मारूती काकडे, रुकमिन हनुमंत साखरे आणि पुजा राजाभाऊ काकडे या ११ जणां विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हाचा पुढील तपास हा पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे पुढील तपास करीत आहेत.

# पद्मभूषण स्व. रतन टाटाजी जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांचा प्रेरणादायी कार्यक्रम



मुंबई / प्रतिनिधी :-इंडिया मीडिया लिंक अँड इव्हेंट्स मॅनेजमेंट यांच्या वतीने पद्मभूषण स्व. रतन टाटाजी यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांचा प्रेरणादायी कार्यक्रम एनएबी पुनर्वसन विभाग, आनंद निकेतन, किंग जॉर्ज इन्फर्मरी, डॉ. ई. मोझेस रोड, मुंबई येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे आयोजन के. रवि दादा (सीईओ) इंडिया मीडिया लिंक ॲंड इवेंट्स मैनेजमेंट यांनी केले आहे.

या कार्यक्रमास आलोककुमार कासलीवाल (एस कुमार ग्रुप), रविंद्र जैन, प्रीतम आठवले, भाग्यश्री वर्तक, अभिनेता. बॉबी वत्स, एडवोकेट . अशोक यादव, हमीद खान, सीता वेणी, रमाकांत मुंडे, जयश्री ठाकूर, दिनेश परेशा, यशवंत भंडारे, पल्लवी कदम, रॉकी फर्नांडिस, प्रकाश दुपारगुडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना पत्रकार . सुरेश यादव यांनी प्रभावीपणे सादर केली.

यावेळी के. रवि ( दादा ) यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, स्व. रतन टाटा साहेबांची जयंती ही केवळ स्मरणदिन न राहता शासनाच्या वतीने सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरी व्हावी. देशाच्या औद्योगिक व सामाजिक प्रगतीत रतन टाटा यांचे योगदान अतुलनीय आहे.

तसेच रतन टाटा जयंतीनिमित् दुबई मधील बुर्ज खलिफा येथे बॅनर प्रसारित करण्यासाठी निवेदन दिले असून त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती त्यांनी दिली. याशिवाय २८ जानेवारी २०२६ रोजी समुद्रातील बोटीमध्ये रक्तदान शिबिर व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

रतन टाटा यांना अभिवादन म्हणून त्यांनी के . रवि ( दादा ) ह्यांनी एक अनोखी संकल्पना ही. मांडली रतन टाटा जयंतीच्या दिवशी शहरातील प्रत्येक कुटुंबाने आपल्या सोयीनुसा किमान एक तास लाईट बंद ठेवावी.

आजही अध्यक्षा देशाच्या अनेक गावांमध्ये व वस्त्यांमध्ये पुरेशी वीज पोहोचलेली नाही. शुरुआती पासूनच वीज निर्मितीत टाटांचा मोठा सहभाग असल्याने वाचवलेली वीज इतरांच्या उपयोगी यावी, हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी आलोककुमार कासलीवाल यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, नेत्रहीन व्यक्तींना 'नेत्रदीपक' बनवण्यासाठी




मी स्वतः पुढाकार घेणार आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये मोठी शारीरिक क्षमता असते. योग, प्राणायाम, व्यायाम व संतुलित आहाराच्या माध्यमातून ती क्षमता सक्रिय ठेवणे गरजेचे आहे. विनाकारण हॉस्पिटल खर्च करण्यापेक्षा योग्य नियोजन केल्यास आपण शारीरिकदृष्ट्या सक्षम राहू शकतो. तसेच या प्रशिक्षण प्रकल्पासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

या प्रसंगी अंध प्रशिक्षणार्थींच्या कला-कौशल्य प्रशिक्षणासाठी भाग्यश्री वर्तक (वर्तक ताई) यांनी १०,००० रुपयांचा निधी देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपली.

कार्यक्रमाच्या वेळी स्व. रतन टाटा यांच्या सेल्फी प्रतिमेस सप्तरंगी फुलांनसहित आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सर्व उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक जाणीव, प्रेरणादायी विचार आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.व आता सर्वांचे लक्ष्य बुधवार २८ जनवरी २०२६ कडे आहे .

## थायलंडचे पूज्य भिख्खू अजान जयसारा यांचा बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागात विशेष मंगलमय संवाद धम्मयात्रा.

विशेष प्रतिनिधी मोताळा - थायलंड येथील राजघराण्यातील पूज्य भिख्खू भदंत अजान जयसारो यांचा बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागात विशेष मंगलमय संवाद धम्मयात्रा सुरवात झाली आहे. मोताळा तालुक्यातील विविध ठिकाणी ही मंगलमय धम्मयात्रा भेट देणार आहे.२७ डिसेंबर ला दुपारी २ वाजता त्यांचे धम्मसारा शांतीभूमी टाकळी वाघजाळ येथे आगमन झाले होते,२८ डिसेंबर रोजी कोऱ्हाळा बाजार येथे आगमन झाले असता धम्मक्रांती ग्रुप कोऱ्हाळा बाजार धम्म उपासक राजेंद्र सुखदेव सोनोने, विजय मनोहर उजागर,ॲड पुकराज सुरडकर,श्रावण रावजी इंगळे,स्वप्नील राजाराम सुरडकर,सचिन



उजागर,दीपक मोरे,सचिन बिऱ्हाळे,करण हिवाळे,गौरव आनंदा खराटे यांनी त्यांचे पुष्प उधळून भव्य स्वागत केले.

ग्रामीण भागात भिख्खू कसा असावा याबाबत माहिती देतांना तुडाँग म्हणजेच पाली भाषेमध्ये धुतांग ही भिख्खूनां सुख सोयीचा त्याग करून त्यांची साधना अधिक प्रगल्भ करण्यासाठी आणि निर्वाण प्राप्त करण्यासाठी शक्तिशाली,ऐच्छिक प्रशिक्षण पद्धत आहे.असे पूज्य भंते अजान जयसारा यांनी सांगितले,या संपूर्ण कालावधी मध्ये भिख्खू संघ धम्मसारा शांतीभूमी टाकळी वाघजाळ येथे वास्तव करणार आहे.त्यावेळी ते धम्म देशना देणार आहेत त्याचा लाभ ग्रामीण भागातील सर्व धम्म उपासक उपासिका यांनी घ्यावा असे आवाहन धम्मक्रांती ग्रुप कोऱ्हाळा बाजार धम्म उपासक व धम्मसारा शांतीभूमी टाकळी वाघजाळ यांनी केले आहे.

# टप्पा तीन व चार मधून शिक्षक कॉलनी परिसरातील कामे मार्गी लावणार-डॉ. हारुणभाई इनामदार

केज/प्रतिनिधी-केज शहरातील बीड रोडवर शिक्षक कॉलनी जवळ जीवन शिक्षण विद्यालयाच्या समोर लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या नावाचा चौक स्थापन करण्यात आला असून केज नगरपंचायत च्या सर्वसाधारण सभेमध्ये या चौकाला एक मताने मंजुरी देण्यात आली. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ. हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड, नगरसेवक अझरभाई इनामदार यांचा शिक्षक कॉलनी येथील नागरिकांनी भव्य नागरिक सत्काराचे आयोजन केले होते.

यांप्रसंगी बोलताना डॉ.हारुणभाई इनामदार म्हणाले की,केज शहरातील शिक्षक कॉलनी भागातील प्रलंबित प्रश्न, रस्ते, नाल्या आणि विजेच्या समस्या प्राधान्याने सोडवल्या जातील पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, शिक्षक कॉलनी परिसरातील विविध विकास कामे ही टप्पा तीन व चार मधून लवकरच करण्यात येणार आहेत व तसा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे बरिच कामे ही मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहेत. या भागातील विकास कामासाठी आम्ही तत्पर आहोत विकास कामे करण्यासाठी कसल्याच प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही असे केज नगरपंचायतचे गटनेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते हारुणभाई इनामदार आश्वासित केले.

शिक्षक कॉलनी,उमरी रोड या परिसरामध्ये एक भव्य दिव्य असे उद्यान उभारण्यात येत आहे त्यासाठी १ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आलेला आहे. उद्यान्याचे काम एका महिन्यात सुरू होणार असल्याची घोषणा नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांनी यावेळी केली.

शिक्षक कॉलनी भागातील आंबेजोगाई-बीड हायवेवर 'स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब चौक' स्थापन करण्यात आला आहे. पत्रकार प्रकाश मुंडे व या भागातील युवक यांच्या पुढाकारातून आणि नगरपंचायतच्या सर्वानुमते ठरावाद्वारे या चौकास मंजुरी मिळाल्याबद्दल, शिक्षक



कॉलनीतील नागरिकांच्या वतीने कृतज्ञता सोहळा व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

विकासासाठी आम्ही कटिबद्ध : मान्यवरांचे प्रतिपादन

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ.हारुणभाई इनामदार यांनी कॉलनीतील रस्ते , नाली, लाईट डीपी व इतर नागरी सुविधांच्या पूर्ततेचे आश्वासन दिले. नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, शिक्षक कॉलनी भागातील समस्या सोडवण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करेन. तर नगरसेवक आझहरभाई इनामदार यांनीही या भागाच्या विकासासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.या सोहळा

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबासाहेब केदार सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राध्यापक मुकुंद मुले सर यांनी मानले. या प्रसंगी मान्यवरांचा सत्कार प्रकाश मुंडे, खय्युम शेख, अमोल धस, अमोल घुले, रवी घुले, अमोल मुंडे, पप्पू गायकवाड, रणजित घुले आणि प्रविण साबळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यांची लाभली उपस्थिती: या कार्यक्रमास एम.डी. घुले सर, चंदू चौरे, सोनू धस, महादेव जाधवर, नागरगोजे साहेब, तांबडे सर, रोहित मुंडे, राजेश गवळी सर, बाबा मुंडे सर, गायकवाड ताई यांच्यासह शिक्षक कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.